**“सन २०२६ च्या दुष्काळ व टंचाईच्या परिस्थितीच्या अनुषंगाने महसूल विभागातील नायब तहसीलदार ते निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांचे सूक्ष्म नियोजन, प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याबाबत....”**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१७०/आस्था-०१ (ई-१८७८२९५)**
मंत्रालय मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२६

**वाचा :-**

१. दुष्काळ व टंचाईच्या परिस्थितीबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके.
२. सन २०२६ मधील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये लागू करण्यात आलेल्या दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना व सवलतींबाबतचे शासन निर्देश.

**शासन परिपत्रक :-**

सन २०२६ मध्ये राज्यातील काही तालुक्यांमध्ये माहे जून ते माहे ऑक्टोबर या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांमुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, संबंधित तालुक्यांमध्ये दुष्काळ निवारणाच्या विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

**०२.** दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पंचनामे तात्काळ सुरू करणे, पीक परिस्थितीचे छायाचित्र व GPS Coordinates संकलित करून अहवाल सादर करणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जास्तीत जास्त कामे सुरू करणे, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, पाणीपुरवठा खंडित होऊ नये यासाठी उपाययोजना करणे, अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, जनावरांसाठी चारा उपलब्ध करणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच पिण्याच्या व पशुधनासाठी पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

**०३.** सद्यस्थितीत दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, शासनाच्या उपाययोजनांची वेळेत अंमलबजावणी होणे, संबंधित अधिकारी/कर्मचारी प्रत्यक्ष क्षेत्रात उपलब्ध असणे आणि प्रत्येक तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचे सूक्ष्म पातळीवर नियोजन होणे अत्यावश्यक आहे. दुष्काळ व

टंचाईच्या काळात पाणीपुरवठा, टँकर, चारा, रोहयो, पीक पंचनामे, जलसंधारण, शासकीय सवलती व इतर मदत उपाययोजनांबाबत विलंब अथवा हलगर्जीपणा झाल्यास त्याचा थेट परिणाम नागरिक, शेतकरी व पशुधनावर होऊ शकतो.

**०४.** त्या अनुषंगाने राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या कालावधीत महसूल विभागातील नायब तहसीलदार ते निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी या संवर्गातील संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित जबाबदाऱ्या अत्यंत दक्षतेने पार पाडाव्यात. त्यासाठी पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(अ) दुष्काळग्रस्त तालुक्यातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडू नये.

(आ) प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील दुष्काळ व टंचाईची गावनिहाय/क्षेत्रनिहाय परिस्थितीचे सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी.

(इ) दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांमध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब अथवा हलगर्जीपणा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ई) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी नियमित क्षेत्रभेटी घेऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी व क्षेत्रभेटीची नोंद ठेवावी. आवश्यकतेनुसार तातडीच्या उपाययोजना प्रस्तावित करून त्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

(उ) दुष्काळ निवारणाच्या कामांची प्रगती, प्रलंबित बाबी, आवश्यक निधी/ मनुष्यबळ/ साधनसामग्री आणि तातडीच्या उपाययोजनांची माहिती नियमितपणे वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करावी.

(ऊ) जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी दुष्काळ निवारणाच्या सर्व उपाययोजनांचे नियमित संनियंत्रण करावे व त्रुटी आढळल्यास तात्काळ सुधारणा करण्याचे निर्देश द्यावेत.

(ए) महसूल विभागाच्या अखत्यारितील नायब तहसीलदार संवर्गापर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या/ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दुष्काळ व टंचाई निवारणाच्या कामात कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर, हलगर्जीपणा, शासनाच्या निर्देशांचे उल्लंघन अथवा कामकाजात अनावश्यक विलंब झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध आवश्यक प्रशासकीय कार्यवाही/निलंबन करण्याचे मा.मंत्री (महसूल) यांचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना या आदेशाव्दारे प्रत्यार्पित करण्यात येत आहेत.

(ऐ) महसूल विभागाच्या अखत्यारितील तहसीलदार, उप जिल्हाधिकारी/प्रांत अधिकारी, उप अधीक्षक भूमी अभिलेख (SLR) व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (DIG) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बाबतीत दुष्काळ व टंचाई निवारणाच्या कामात कर्तव्यात कसूर, हलगर्जीपणा, शासनाच्या निर्देशांचे उल्लंघन अथवा कामकाजात अनावश्यक विलंब झाल्याचे

निदर्शनास आल्यास,संबंधितांविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही/निलंबन करण्याचे मा.मंत्री (महसूल) यांचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना या आदेशाव्दारे प्रत्यार्पित करण्यात येत आहेत.

**०५.** वरील निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून दुष्काळग्रस्त नागरिक, शेतकरी व पशुधन यांना शासनाच्या दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांचा लाभ वेळेत मिळेल याची संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी दक्षता घ्यावी.

**०६.** वरील सर्व निर्देश हे केवळ दुष्काळ व टंचाईची परिस्थिती अस्तित्वात असलेल्या कालावधीपुरतेच लागू राहतील.

**०७.** वरीलप्रमाणे अधिकार प्रत्यार्पित करण्यात येत असले तरीसुध्दा मा.भारत निवडणूक आयोग, मा.राज्य निवडणूक आयोग, मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य व जनगणना आयुक्त, भारत सरकार यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचना बंधनकारक राहतील.

**०८.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६१०१५१७३९४८१९४८ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.10.15 17:41:00 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ. शु., क्रीडा व अल्पसंख्यांक विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व अपर आयुक्त (महसूल/सामान्य), विभागीय आयुक्त कार्यालय
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
१५. निवडनस्ती (आस्था-०१), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.